आकाशवाणी मुंबई

राष्ट्रीय  बातमीपत्र रात्री  ८.०५ वाजता

२२  मार्च २०२४ - शुक्रवार

**ठळक बातम्या**

- ‘आर. एल. व्ही. पुष्पक’ या उपग्रह प्रक्षेपक वाहनाचं चित्रदुर्ग चाचणी केंद्रावर यशस्वी अवतरण
- भूतानच्या सर्वोच्च नागरी पुरस्कार ‘ऑर्डर ऑफ द ड्रुक ग्याल्पो’ नं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांचा सन्मान
- दिल्लीचे मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांच्या रिमांड प्रकरणी दिल्लीतल्या न्यायालयाकडून निर्णय राखीव

**आणि**

- इंडियन प्रीमियर लीग क्रिकेट स्पर्धा आजपासून सुरु, पहिल्या सामन्यात नाणेफेक जिंकून फलंदाजीचा रॉयल चॅलेंजर्स बेंगळुरूचा निर्णय

**<><><><><><>**

इस्रो अर्थात भारतीय अंतराळ संशोधन संस्थेनं आज सकाळी कर्नाटक मधल्या चित्रदुर्ग चाचणी केंद्रावर पुनर्वापर करण्याजोग्या ‘आर. एल. व्ही. पुष्पक’ या उपग्रह प्रक्षेपक वाहनाचं यशस्वीपणे लँडिंग केलं. या अभियानाच्या चमूचं इस्रोचे अध्यक्ष सोमनाथ यांनी अभिनंदन केलं आहे.

इस्रोच्या आजच्या यशस्वी मोहिमेनं उपग्रह संचालन, नियंत्रण प्रणाली, लँडिंग गियर आणि डिलेरेशन प्रणाली यांसारख्या क्षेत्रात देशांतर्गत  विकसित तंत्रज्ञानाची गुणवत्ता पुन्हा एकदा सिद्ध झाली आहे. ‘पुष्पक’चं स्वयंचलित यशस्वी लँडिंग करून आणखी एक उल्लेखनीय कामगिरी केल्याबद्दल इस्रोच्या वैज्ञानिकांचं, माहिती आणि प्रसारण मंत्री अनुराग सिंह ठाकूर यांनीही अभिनंदन केलं आहे.

**<><><><><><>**

भूतानचे राजे जिग्मे खेसर नामग्याल वांगचुक यांनी आज थिम्पू इथं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांना ‘ऑर्डर ऑफ द ड्रुक ग्याल्पो’ या भूतानच्या सर्वोच्च नागरी पुरस्कारानं सन्मानित केलं. हा सन्मान म्हणजे आपली वैयक्तिक कामगिरी नसून, भारताचा आणि १४० कोटी भारतीयांचा सन्मान असल्याचं प्रधानमंत्री यावेळी म्हणाले. त्यांनी सर्व भारतीयांच्या वतीने हा सन्मान स्वीकारला आणि हा पुरस्कार मिळाल्याबद्दल कृतज्ञता व्यक्त केली. या पुरस्कार प्रदान झालेले ते पहिलेच परदेशी व्यक्ती आहेत.

**<><><><><>**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी आणि भूतानचे प्रधानमंत्री शेरिंग टोबगे यांच्या उपस्थितीत आज दोन्ही देशांमधली द्विपक्षीय भागीदारी आणखी मजबूत करण्यासाठी परस्पर हिताच्या अनेक करारांवर स्वाक्षरी झाली. थिंपू इथं झालेल्या बैठकीत दोन्ही देशांनी विविध क्षेत्रांशी संबंधित सामंजस्य करारांवर स्वाक्षरी केली.

पेट्रोलियम उत्पादनं आणि तेल पुरवठा, ऊर्जा कार्यक्षमतेबाबतचं सहकार्य, क्रीडा आणि युवा तसंच औषधी उत्पादनांची चाचणी याच्याशी संबंधित अनेक सामंजस्य करारांची दोन्ही बाजूंमध्ये देवाणघेवाण झाली. याशिवाय अवकाश क्षेत्रातल्या सहकार्याबाबत संयुक्त कृती आराखड्यावरही दोन्ही देशांची सहमती झाली. या बैठकीत दोन्ही नेत्यांनी द्विपक्षीय संबंधांचा आढावा घेतला आणि बहुआयामी भागीदारी आणखी मजबूत करण्याच्या वचनबद्धतेला दुजोरा दिला.

**<><><><><>**

दिल्ली अबकारी धोरण कथित प्रकरणी दिल्लीचे मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांना १० दिवसांची कोठडी द्यावी अशी मागणी ईडी अर्थात सक्त वसुली

संचालनालयानं न्यायालयाकडे केली आहे. याप्रकरणी दिल्लीच्या राऊज अव्हेन्यू न्यायालयानं निर्णय राखून ठेवला आहे.

दिल्ली उच्च न्यायालयानं केजरीवाल यांना अटकेपासून संरक्षण नाकारल्यानंतर सक्तवसुली संचालनालयानं काल त्यांना अटक केली. आम आदमी पक्षाचे नेते सौरव भारद्वाज आणि मंत्री अतिशी यांनाही पोलिसांनी ताब्यात घेतलं आहे. दरम्यान केजरीवाल यांनी सक्तवसुली संचालनालयाच्या समन्सला आव्हान देणारी याचिका मागे घेतली आहे.

केजरीवाल यांच्या अटकेच्या निषेधात आम आदमी पार्टीने आज दिल्लीसह देशभरात विविध ठिकाणी निदर्शनं केली. केजरीवाल यांच्या अटकेची कारवाई चुकीची आणि घटनाबाह्य असल्याची टीका काँग्रेसच्या सरचिटणीस प्रियांका गांधी-वड्रा यांनी केली आहे. ज्येष्ठ नेते शरद पवार यांनीही या कारवाईचा निषेध केला आहे. हे प्रकरण भ्रष्टाचाराविरुद्धच्या कायदेशीर प्रकियेचा भाग असल्याचं भाजपाचे वरिष्ठ नेते रविशंकर प्रसाद यांनी म्हटलं आहे.

दिल्ली मद्य धोरण घोटाळा प्रकरणी अटकेत असलेल्या भारत राष्ट्र समितीच्या नेत्या के. कविता यांचा जामीन अर्ज दाखल करून घ्यायला सर्वोच्च न्यायालयानं आज नकार दिला.

**<><><><><><>**

लोकसभा निवणुकीच्या पार्श्वभूमीवर महायुतीतल्या नेत्यांनी आज मुंबईत उपमुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांच्या शासकीय निवासस्थानी दिवसभर चर्चा केली. निवडणूक संचालन समितीची बैठकही यावेळी झाली. या बैठकीला भाजपा प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे, आमदार आशिष शेलार उपस्थित होते. केंद्रीय राज्यमंत्री रावसाहेब दानवे, मंत्री संजय राठोड यांनीही आज फडनवीस यांची भेट

घेतली. भाजपानं याआधी राज्यातल्या २० उमेदवारांची यादी जाहीर केली आहे. आता उर्वरित २८ जागांसाठी महायुतीमध्ये जागावाटप होणं बाकी आहे. या पार्श्वभूमीवर या बैठका झाल्या.

**<><><><><>**

यापुढं आपण कोणतीही निवडणूक लढवणार नसल्याचा पुनरुच्चार ज्येष्ठ नेते शरद पवार यांनी केला आहे. ते आज बारामतीमध्ये बातमीदारांशी बोलत होते. महाविकास आघाडीतल्या जागा वाटपावर चर्चा सुरू आहे, असं त्यांनी सांगितलं. दिल्लीचे मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांच्यावरच्या अटकेच्या करावाईवर पवार यांनी टीका केली.

**<><><><><>**

दिल्लीचे मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांच्या अटकेप्रकरणी विरोधी पक्षांनी निवडणूक आयोगाला हस्तक्षेप करण्याची विनंती केली आहे. सर्वपक्षीय सदस्यांच्या शिष्टमंडळानं आज आयोगाची भेट घेतली. यावेळी तृणमूल काँग्रेस, द्रमुक, डावे, समाजवादी पक्ष यांच्यासह इतर पक्षाचे नेते उपस्थित होते. स्वतंत्र भारताच्या इतिहासात पहिल्यांदाच एखाद्या मुख्यमंत्र्यांला अटक झाल्याचा दावा विरोधी पक्षाच्या नेत्यांनी या भेटीनंतर केला. विविध केंद्रीय तपास संस्थांचा विरोधकांच्या विरोधात गैरवापर केला जात असल्याचा काँग्रेस नेते अभिषेक मनु सिंघवी यांनी केला. यामुळं निवडणूक प्रक्रिया निष्पक्षरित्या पार पडण्याकडे आणि लोकशाही व्यवस्थेकडे दुर्लक्ष होत असल्याचा दावा त्यांनी केला.

**<><><><><>**

लोकसभा निवडणुकीसाठी, भाजपानं आज १५ उमेदवारांची चौथी यादी जाहीर केली. त्यात तामिळनाडू आणि पुदुच्चेरीमधल्या लोकसभा मतदारसंघांमधले

उमेदवार घोषित केले आहेत. भाजपानं याआधी २७६ उमेदावारांची नावं या निवडणुकीसाठी जाहीर केली आहेत.

<><><><><><>

उत्तराखंड मध्ये अल्मोरा आणि हरिद्वारमधल्या लोकसभेच्या जागांसाठी भारतीय जनता पक्षाच्या उमेदवारांनी आज अर्ज दाखल केले. अल्मोरामधून अजय टामटा तर हरिद्वारमधून उत्तराखंडचे माजी मुख्यमंत्री आणि हरिद्वार लोकसभा मतदारसंघातील भाजपचे उमेदवार त्रिवेंद्र सिंह रावत यांनी अर्ज दाखल केले आहेत. या राज्यातल्या एकाही लोकसभेच्या जागेसाठी कॉंग्रेस पक्षाच्या उमेदवारांनी अद्याप अर्ज भरलेले नाहीत.

<><><><><><>

लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर राष्ट्रवादी काँग्रेस पक्षानं जाहीरनामा समिती जाहीर करण्यात आली आहे. समितीच्या अध्यक्षपदी सहकार मंत्री दिलीप वळसे-पाटील यांची निवड करण्यात आली आहे. ही समिती २० जणांची असून त्यात मंत्री धनंजय मुंडे, मंत्री अनिल पाटील, विधानसभेचे उपसभापती नरहरी झिरवळ, मंत्री आदिती तटकरे यांचा समावेश आहे.

<><><><><><>

विमानात नियुक्त कर्मचाऱ्यांच्या कामाच्या वेळा आणि शिणवटा व्यव्यस्थापन यातील चुकांबद्दल नागरी विमान वाहतूक महासंचालनालयानं एअर इंडियाला ८० लाख रुपयांचा दंड केला आहे. जानेवारी महिन्यात एअर इंडियाचं या बाबतीत अचानक परीक्षण झालं होतं यावेळी एअर इंडियाकडून झालेल्या या चुका नोंदवण्यात आल्या होत्या.

<><><><><><>

इंडियन प्रीमियर लीग क्रिकेट स्पर्धा आजपासून सुरू झाल्या.  गतविजेत्या चेन्नई सुपर किंग्ज आणि रॉयल चॅलेंजर्स बेंगळुरू यांच्यातला सामना चेन्नईच्या एम. ए चिदंबरम स्टेडियमवर सुरू आहे. या सामन्यात रॉयल चॅलेजर्सं बेंगळुरूनं नाणेफेक जिंकून फलंदाजीचा निर्णय घेतला. शेवटचं वृत्त हाती आलं तेव्हा बेंगळुरूच्या पहिल्या षटकात बिनबाद ७ धावा केल्या होत्या.

<><><><><><>

रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाच्या केंद्रीय संचालक मंडळाची ६०७ वी बैठक आज नागपुरात गव्हर्नर शक्तिकांत दास यांच्या अध्यक्षतेखाली झाली. जागतिक आणि देशांतर्गत आर्थिक परिस्थिती, तसंच भू-राजकीय घडामोडी आणि जागतिक आर्थिक बाजारातल्या अस्थिरतेमुळे निर्माण झालेल्या आव्हानांचा आढावा या बैठकीत घेण्यात आला. चालू आर्थिक वर्षात रिझर्व्ह बँकेनं डिजिटल पेमेंट, ग्राहक शिक्षण आणि जागरूकता यांमध्ये केलेल्या प्रगती संदर्भात या बैठकीत चर्चा झाली.

आजच्या बैठकीत बँकेच्या वर्ष २०२४-२५ च्या अर्थसंकल्पाला देखील मंजुरी दिली असल्याचं आर बी आयनं आज जारी केलेल्या प्रसिद्धी पत्रात म्हटलं आहे.

<><><><><><>

गाझा पट्टीमधल्या नागरिकांचं संरक्षण व्हावं आणि पॅलेस्टाईन जनतेला मानवतावादी दृष्टीकोनातून मदत मिळावी यासाठी तात्काळ आणि दीर्घकाळ शाश्वत राहणारी युद्धबंदी होण्याकरता संयुक्त राष्ट्रांनी केलेल्या ठरावावर  आज मतदान होत आहे. संयुक्त राष्ट्रांचे सचिव अँटोनी ब्लिंकेन यांनी आज तेल अविव्ह इथे इस्रायलच्या पंतप्रधानांची भेट घेतली . युरोपिअन युनियननं देखील इस्रायल हमास युद्ध थांबावं यासाठी आवाहन केलं आहे.संयुक्त राष्ट्रांचे महासचिव अंतोनियो

गुट्टेरास यांनीही ब्रसेल्स इथे युरोपियन युनियनच्या नेत्यांची भेट घेतली आणि त्यांना युद्धबंदीला पाठिंबा देण्याची विनंती केली.

**<><><><><><>**

ईशान्य भारतात येत्या २६ मार्च पर्यंत मेघगर्जनेसह जोरदार पाऊस पडेल असा हवामान विभागाचा अंदाज आहे. अरुणाचल प्रदेश, आसाम, मेघालय, नागालँड, मणिपूर, मिझोराम, त्रिपुरा, सिक्कीम आणि पश्चिम बंगालच्या डोंगराळ प्रदेशात पुढले पाच दिवस मेघगर्जनेसह पाऊस पडेल, असा अंदाज आहे.

**//<><><><><><>//**